# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 05 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०५ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांचा आज शपथविधी
- नागपूरसह विदर्भाच्या अनेक भागात भूकंप–तेलंगणात मुलुगू इथं भूकंपाचा केंद्रबिंदू
- समृद्धी महामार्गावर कार आणि कंटेनर अपघातात छत्रपती संभाजीनगर इथल्या दोघांचा मृत्यू
- १९ वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघ उपांत्य फेरीत दाखल

आणि

- पुरूषांच्या कनिष्ठ आशियाई हॉकी स्पर्धेत पाकिस्तानाला हरवत भारतीय संघ अजिंक्य

****

महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस आज शपथ घेणार आहेत. मुंबईत आझाद मैदानावर सायंकाळी साडे पाच वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत, राज्यपाल सी पी राधाकृष्णन हे मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातल्या सदस्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. केंद्रीय मंत्रिमंडळाचे अनेक सदस्य तसंच राष्ट्रीय लोकशाही आघाडी शासित राज्यांचे मुख्यमंत्री देखील यावेळी उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस या महायुतीच्या नेत्यांनी काल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे सत्ता स्थापनेचा दावा केला. भाजप,

शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासह मित्रपक्षांच्या एकूण २३७ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र राज्यपालांकडे सादर करण्यात आलं. यावेळी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार, यांच्यासह केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन, भाजप नेते विजय रूपाणी उपस्थित होते. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत भाजपचे विधीमंडळ गटनेते देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत माहिती दिली....

***"सन्माननीय राज्यपाल महोदयांना पत्र दिलेलं आहे. आणि नियमानुसार राज्यामध्ये नवीन मंत्रिमंडळ स्थापन करण्याकरता आमचा दावा मी पेश केलेला आहे. माननीय राज्यपालांनी आमचा दावा त्याठिकाणी घेतल्यानंतर, आम्हाला पाच तारीख संध्याकाळी साडेपाच वाजता शपथविधीची वेळ नेमून दिलेली आहे. भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, जनसुराज्य पक्ष, युवा स्वाभिमान पक्ष, रासप आणि अपक्ष अशी एक मोठी महायुती या ठिकाणी झालेली आहे, या सगळ्यांच्या सहीचं पत्र ते आम्ही दिलेला आहे."***

काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलतांना महायुतीच्या वतीने मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला एकमताने पाठिंबा देणारं पत्र राज्यपालांकडे सुपूर्द केल्याचं सांगितलं. ते म्हणाले..

***"मला आनंद आहे की, अडीच वर्षांपूर्वी देवेंद्रजींनी मी मुख्यमंत्री व्हावा म्हणून माझ्या नावाची शिफारस केली होती. आणि आज देवेंद्रजी मुख्यमंत्री व्हावेत अशी शिफारस आणि पाठिंबाचे पत्र शिवसेनेच्या वतीने आज आम्ही दिलंय. आणि यापूर्वीच शिवसेनेचा पाठिंबा आणि पूर्ण समर्थन भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना, देवेंद्रजींना आम्ही देऊन टाकला होता."***

तत्पूर्वी, काल मुंबईत झालेल्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत भारतीय जनता पक्षाच्या विधीमंडळ पक्षनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड करण्यात आली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी निरीक्षक म्हणून या बैठकीला उपस्थित होते. चंद्रकांत पाटील तसंच सुधीर मुनगंटीवार यांनी गटनेतेपदासाठी फडणवीस यांच्या नावाचा एकमेव प्रस्ताव मांडला, त्याला सर्वांनी एकमताने अनुमोदन दिलं.

****

रेल्वे सुधारणा विधेयक २०२४ वर काल लोकसभेत चर्चा झाली. या विधेयकामुळे रेल्वे क्षेत्रात कार्यक्षमता वाढीस लागेल, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. काँग्रेसचे मनोज कुमार यांनी यावेळी बोलतांना, वंदे भारत गाड्यांच्या तिकीटाचा दर जास्त असल्याचा मुद्दा उपस्थित केला.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इस्रोच्या पीएसएलव्ही–सी या अंतराळ यानाचं प्रक्षेपण पुढे ढकलण्यात आलं आहे. श्रीहरिकोटात सतीश धवन अंतराळ केंद्रातून काल दुपारी चार वाजून आठ मिनिटांनी हे यान प्रक्षेपित केलं जाणार होतं. आता हे यान आज दुपारी चार वाजून १२ मिनिटांनी प्रक्षेपित केलं जाईल. तांत्रिक बिघाडामुळे हा बदल करण्यात आल्याची माहिती इस्रोनं दिली आहे.

****

नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्याच्या काही भागात काल सकाळी सात वाजून २९ मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाचा केंद्रबिंदू तेलंगणा राज्यातल्या मुलुगू इथं असून, भूकंपाची तीव्रता पाच पूर्णांक तीन रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. भूकंपात कोणतीही जीवित किंवा वित्त हानी झाल्याचं वृत्त नाही.

****

बीड जिल्हा युवा महोत्सवाला कालपासून प्रारंभ झाला. जिल्हा क्रीडा संकुलावर भरलेल्या या महोत्सवाचं उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांच्या हस्ते झालं. या महोत्सवात विज्ञान आणि तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पनांवरर आधारित स्पर्धा, लोकनृत्य, लोकगीत, कौशल्य विकास कार्यक्रम, कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

लातूर जिल्हा परिषदेमार्फत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हास्तरीय दिव्यांग सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बालाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग विद्यार्थ्यांचे आभा क्रमांक काढण्यासाठी विशेष शिबिर घेण्यात आलं. जिल्ह्यात आतापर्यंत अकरा लाख दोन हजार ६६५ आभा क्रमांक काढण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी दिली.

****

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. बलभीम पाटोदेकर यांचं काल छत्रपती संभाजीनगर इथं निधन झालं, ते ८७ वर्षांचे होते. युनायटेड स्टेट्स माहिती सेवेतून त्यांनी मुंबईत अमेरिकी दूतावासात आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. बीडच्या श्री बंकटस्वामी महाविद्यालयात प्राचार्य म्हणून पाटोदेकर यांनी काम केलं, १९८१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलसचिवपदी त्यांची निवड झाली होती. पाटोदेकर यांच्या पार्थिव देहावर आज छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

नागपूर – मुंबई समृद्धी महामार्गावर नाशिक जिल्ह्यात सिन्नर इथं कार कंटेनरला धडकून झालेल्या अपघातात छत्रपती संभाजीनगर इथल्या बहुजन समाज पक्षाच्या दोन पदाधिकाऱ्यांचा मृत्यू झाला. मुंबईहून बसपाची समिक्षा बैठक आटोपून ते परतत असताना काल पहाटेच्या सुमारास हा अपघात झाला. सचिन बनसोडे आणि प्रशांत निकाळजे अशी मृतांची नावं आहेत.

****

शारजाह इथं सुरू असलेल्या १९ वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात भारताने संयुक्त अरब अमिरातीचा दहा गडी राखून पराभव केला. या विजयासह भारत अ गटात चार गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे.
काल झालेल्या दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात पाकिस्तानने जपानचा १८० धावांनी पराभव केला. आता आज होणाऱ्या उपांत्य सामन्यांमध्ये भारताची लढत श्रीलंकेच्या संघाशी तर पाकिस्तानची लढत बांगलादेश संघाशी होणार आहे. या सामन्यांमधल्या विजेत्या संघांमध्ये येत्या आठ तारखेला दुबईच्या आंतरराष्ट्रीय मैदानावर अंतिम सामना होणार आहे.

****

भारताने पुरूषांच्या कनिष्ठ आशियाई हॉकी आशिया स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं आहे. ओमान मधल्या मस्कत इथं काल झालेल्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा पाच – तीन असा पराभव केला. भारताने पाचव्यांदा या स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं आहे.

****

जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी काल चालू वर्षाचा अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा घेतला. प्रलंबित कामं वेळेत तसंच गुणवत्तापूर्वक करण्याच्या सूचना पांचाळ यांनी यावेळी विभागप्रमुखांना दिल्या.

****

परभणी जिल्ह्यातही सर्व विभागांनी विकास कामं विहित मुदतीत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिले आहेत. मंजूर निधी परत दिलं जाणार नाही, याची खबरदारी घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

****

नांदेड जिल्हा रुग्णालयात काल राष्ट्रीय जंतनाशक मोहिम राबवण्यात आली. जिल्ह्यातल्या शाळांमधल्या एक ते १९ वर्षे वयोगटातल्या बालकांना जंतनाशक गोळी खाऊ घालण्यात आली. काल गैरहजर असलेल्या बालकांना येत्या दहा तारखेला जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे.

****

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाअंतर्गत धाराशिव जिल्ह्यातल्या दहा प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट आरोग्यसंस्था म्हणून प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आलं. केंद्रीय आरोग्य विभागाच्या पथकामार्फत या आरोग्य केंद्राची तपासणी करण्यात आली होती.

****

अंबाजोगाई इथं योगेश्वरी देवीचा मार्गशीर्ष महोत्सव येत्या ८ ते १५ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. या महोत्सवात रामायणाचार्य रामराव ढोक महाराजांचं कीर्तन, अभंगवाणी, संगीत रजनी तसंच भजनासह विविध सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या `महापरिनिर्वाण दिनानिमित्त` उद्या सहा डिसेंबरला डॉ. आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित दोन माहितीपट आणि एक चित्रपट, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवरून प्रसारित करण्यात येणार आहेत.

दरम्यान, दक्षिण मध्य रेल्वेतर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदिलाबाद – दादर ही अनारक्षित विशेष रेल्वे चालवण्यात येणार आहे. ही रेल्वे आज अदिलाबाद इथून निघत असून, शनिवारी दादर इथून निघणार आहे.

✻✻✻✻